भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# –: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :–

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक १७.०८.२०१९ ते २१.०८.२०१९)

| अंक ६६/२०१९ | दिनांक १६.०८.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१०/०८/२०१९ ते १६/०८/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता १७/०८/२०१९ ते २१/०८/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०/०८ | ११/०८ | १२/०८ | १३/०८ | १४/०८ | १५/०८ | १६/०८ | दिनांक | | १७/०८ | १८/०८ | १९/०८ | २०/०८ | २१/०८ |
| ६३.४ | ४५.९ | २७.० | १४.८ | १०.६ | ६२.२ | १९.८ | पाऊस (मि. मी) | | २८ | २४ | ३५ | १२ | १० |
| २९.० | २९.५ | २९.५ | ३०.० | ३०.० | २९.५ | २९.५ | कमाल तापमान (अं. से) | | २९ | ३० | ३० | २९ | ३० |
| २३.५ | २३.५ | २३.० | २३.० | २४.० | २४.० | २४.० | किमान तापमान (अं. से) | | २३ | २३ | २३ | २३ | २३ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) | ६ | ८ | ८ | ८ | ७ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार | | | | | | |
| ८९ | ८५ | ९७ | ९७ | ९३ | ९६ | ९३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ९४ | ९२ | ९४ | ९४ | ९२ |
| ८४ | ७७ | ८५ | ७८ | ८५ | ८४ | ७८ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ८४ | ७५ | ७६ | ८२ | ७६ |
| ५.९ | ३.१ | २.० | ०.७ | ०.९ | ०.४ | ०.२ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | | ०१० | ००६ | ००५ | ००५ | ००४ |
| दक्षिणे | दक्षिणे | दक्षिणे | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ | वा-याची दिशा | पश्चिमे कडून | नैऋत्ये कडून | दक्षिणे कडून | दक्षिणे कडून | दक्षिणे कडून |
| दक्षिणे | पश्चिमे | दक्षिणे | पश्चिमे | दक्षिणे | दक्षिणे | पश्चिमे | दुपार | | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ३४२७.९ | ३४२७.९ | २४३.७ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्हयात मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | फुटवे | भात पिक सदयस्थितीत फुटवे येण्याच्या अवस्थेत आहे तरी भात खाचरातील पाण्याची पातळी ५ से. मी पर्यंत ठेवावी.<br>काही ठिकाणी भाताच्या पुर्नलागवडीनंतर एक महिना झालेले पीक कमाल फुटवे येण्याच्या अवस्थेत असल्याने नत्र खताचा दुसरा हप्ता प्रति गुंठा ८७० ग्रम युरियाच्या स्वरुपात द्यावा.<br>शेताच्या बांधावरील वाढलेल्या तणांच्या नियंत्रणासाठी पावसाची ऊघडीप पाहून ग्रामोक्झोन हे तणनाशक ३ मिलि प्रती लिटर पाण्यात मिसळून बांधावर फवारावे.<br>जिल्हयामध्ये काही ठिकाणी भातावर पाने गुंडाळणारी अळी व निळे भुंगेरे या किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. पाने गुंडाळणारी अळीच्या नियंत्रणासाठी २५% प्रवाही क्विनॉलफॉस १८ मिली किंवा ट्रायझोफॉस ४०% प्रवाही १३ मिली लॅमडासायहॅलोथ्रिन ५% प्रवाही ५ मिलि प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळुन पावसाची उघडीउ पाहून फवारावे. निळे भुंगेरे या किडीच्या नियंत्रणासाठी २५% प्रवाही क्विनॉलफॉस ४० मिली किंवा ट्रायझोफॉस ४०% प्रवाही १२.५ मिली लॅमडासायहॅलोथ्रिन ५% प्रवाही ५ मिलि प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून पावसाची उघडीउ पाहून फवारावे.<br>भात पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास आवश्यकतेनुसार ट्रायसायक्लॅझोल १० ग्रम किंवा आयसोप्रोथिऑलेन १० मिलि प्रती १० लि. पाण्यातुन फवारावे. |
| नागली | | लावणी करुन एक महिना झालेल्या नागली पिकास नत्र खताचा दुसरा हप्ता प्रति गुंठा ८०० ग्रम युरियाच्या स्वरुपात द्यावा. |
| भुईमुग | शाखीय वाढ | पेरणीनंतर ३०ते ३५ दिवसांनी गरजेनुरुप खुरपणी करुन घ्यावी व त्यानंतर पिकाला स्वस्तीक अवजाराच्या सहाय्याने मातीची भर द्यावी. भुइमुगाच्या लागवडीमध्ये पाण्याचा योग्य निचरा करावा व पिकाची बेणणी करुन घ्यावी. |
| आंबा | - | आंब्यावर फांदेमर रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सीक्लोराइड ०.३% (३० ग्रम/१० ली. पाणी) किंवा ०.१% बोर्डो मिश्रण यापैकी एका बुरशीनाशकाची पावसाची उघडीप पाहुन फवारणी करावी. फांदेमर रोगाने मोठ्या फांद्यामधुन डिंक येत असल्यास रोगग्रस्त साल तासुन त्याठिकाणी बोर्डो मिश्रणाची पेस्ट किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइडची पेस्ट लावावी.<br>आंब्यामध्ये रोगट व सुकलेल्या फांद्या, बांडगुळे कापुन घ्यावीत व त्या ठिकाणी १% बोर्डो मिश्रण लावावे.<br>आंबा पिकात खताची मात्रा देउन झालेली असल्यास नियमित फळधारणेसाठी कलमांना १५ जुलै ते ३१ ऑगस्ट या दरम्यान १० वर्षावरील कलमांना पॅक्लोब्युट्राझॉल द्यावे. पॅक्लोब्युट्राझॉल हे झाडाच्या आकारमानानुसार व पसारा मोजून द्यावयाचे असल्याने झाडाचा पुर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर पसा-याचा व्याज मोजावा. उदा- पुर्व- पश्चिम व्यास ५ मिटर व दक्षिण-उत्तर व्यास ३ मिटर म्हणजे सरासरी व्यास ४ मिटर होईल. २३% पॅक्लोब्युट्राझॉल घटक असलेल्या रसायनातुन द्यावयाचे असल्याने प्रती मिटर व्यासास ३ मिलि प्रमाणे १२ मिलि कल्टार द्यावे. प्रत्येक झाडाला पॅक्लोब्युट्राझॉलची मात्रा घेउन ३ ते ६ लिटर पाण्यात मिश्रण तयार करावे व खताच्या रिंगेच्या आतल्या बाजुस १५ सेमी खोलीचे २५ ते ३० खड्डे खणावे प्रत्येक खड्ड्यात १०० मिली याप्रमाणात पॅक्लोब्युट्राझॉल ओतावे आणि खड्डे बुजवुन घ्यावेत. पॅक्लोब्युट्राझॉल देण्यापुर्वी व नंतर झाडाभोवती असलेले गवत काढुन घ्यावे. तसेच जमिनीत पुरेसा ओलावा असेल याची खात्री करावी व पाऊसाची उघडीप बघुन पॅक्लोब्युट्राझॉल द्यावे.<br>फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ १ मिलि/१लि. पाणी याप्रमाणात मिसळावा. |
| काजु | - | काजुमध्ये जुन्या व रोगट फांद्या कापून त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे.<br>काजुवर खोडकिडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०%प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५०मी.लि.१० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. |
| नारळ व सुपारी | फळधारणा | नारळावरील करपा व सुपारीवरील फळगळ या रोगाच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये १% बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी. |
| भाजीपाला | फळधारणा | बहुतेक ठिकाणी वेलवर्गिय भाज्यांमध्ये वेल तयार झालेला आहे. त्यांना काठीचा आधार द्यावा व मातीची भर द्यावी. भाजीपाला क्षेत्रामध्ये उगवलेल्या तणांची बेणणी करावी. पावसाचा अंदाज बघुन प्रती गुंठा क्षेत्रास ७२० ते ८७० ग्रम युरियाचा एक तृतीयांश हप्ता बांगडी पद्धतीने द्यावा व मांडवाची व्यवस्था करावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता
उदयानविदया महाविदयालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

डॉ. बळवंत ना. सावंत
सहयोगी संशोधन संचालक/नोडल ऑफिसर
(ग्रामिण कृषि मौसम सेवा)
प्रा.फ.सं.के. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग
(०२३६६-२६२२३४, २६२६९३)

डॉ. यशवंत चं. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उदयानविदया महाविदयालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)